# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# लातूर विभागीय मंडळ, लातूर.

क्र.लाविमं/भांडार/उत्तरपत्रिका वाटप/जुलै–ऑगस्ट2024/737 दिनांक 09/07/2024

**परीक्षा प्राधान्य/महत्वाचे**

प्रति,
प्राचार्य/केंद्रसंचालक,
उच्च माध्यमिक प्रमाणपत्र
परीक्षा जुलै–ऑगस्ट 2024
नांदेड/धाराशिव/लातूर

विषय :– माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी)परीक्षा जुलै–ऑगस्ट 2024 या परीक्षेच्या उत्तरपत्रिका, पुरवण्या, आलेख, नकाशे, होलोकाफ्ट स्टिकर्स वापरण्याबाबत...

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, जुलै–ऑगस्ट 2024 च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेसाठी लागणा–या उत्तरपत्रिका, पुरवणी, आलेख, नकाशे, होलोकाफ्ट स्टिकर्स इत्यादी साहित्य हस्तपोहोच पाठविण्यात येत आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे

**<u>माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.10 वी)</u>**

1. **20 पानी उत्तरपत्रिका**

सदरच्या 20 पानी उत्तरपत्रिका सर्व माध्यमांकरीता सर्व विषयांच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी आहेत. सदर उत्तरपत्रिका विद्यार्थ्यांना देतांना आतील पाने क्रमांक पाहून, मळकट, शिलाई नसलेली, फाटलेली नसावी याची दक्षता घेण्यात यावी. सर्व माध्यमांचे विद्यार्थी संख्या विचारात घेवून उत्तरपत्रिकांचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

2. **04 पानी पुरवणी :**

सर्व माध्यमांकरीता सर्व विषयांच्या विद्यार्थ्यांना 04 पानी पुरवण्यांचा वापर आवश्यकतेनुसार करण्यात यावा.

3. **04 आलेख पुरवणी :–**

सदरची आलेख पुरवणी गणित या विषयासाठी विद्यार्थ्यांना द्यावयाची आहे, केंद्रावरील विद्यार्थी संख्या विचारात घेवून सदर पुरवणीचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

4. **04 पानी नकाशा पुरवणी :–**

सदरची नकाशा पुरवणी भूगोल विषयासाठी विद्यार्थ्यांना द्यावयाची आहे, केंद्रावरील विद्यार्थी संख्या विचारात घेवून सदर पुरवणीचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

...2...

5. **ड्रॉईंगशीट :–**

सदरची ड्रॉईंगशीट टेक्निकल (NSQF) विशयासाठी आवश्यक विद्यार्थ्यांना द्यावयाची आहे, केंद्रावरील विद्यार्थी संख्या विचारात घेवून सदर ड्रॉईंगशीटचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

6. **होलोक्राफ्ट स्टिकर्स :–**

उत्तरपत्रिका, पुरवण्या, आलेख, नकाशे इत्यादीवर होलोक्राफ्ट स्टिकर्स चिकटवतांना ज्या ठिकाणी विद्यार्थ्यांचा बैठक क्रमांक, केंद्र क्रमांक पूर्ण झाकला जाईल ठिकाणी स्टिकर्स चिकटवण्यात यावा, जेणे करून गोपनीयतेचा भंग होणार नाही, सदरच्या सूचना आपल्या मार्फत पर्यवेक्षकांनाही देण्यात याव्यात.

**महत्वाची सूचना**

5. केंद्रासाठी उपरोक्त प्रमाणे साहित्य तपासून घ्यावे.
6. उत्तरपत्रिका प्राप्त झाल्यानंतर सुरक्षित ठिकाणी कपाटामध्ये ठेवावे व त्या कपाटाला सील करावे.
7. उत्तरपत्रिका व इतर साहित्याचा हिशोब ठेवावा.
8. परीक्षा संपताच शिल्लक आपल्या संबंधित परिरक्षक कार्यालयात यादीसह जमा करावे व जमा केलेल्या शिल्लक साहित्याचा अहवाल मंडळास आठ दिवसात न चुकता पाठवावा.

(सुधाकर तेलंग)
विभागीय सचिव
लातूर विभागीय मंडळ, लातूर

प्रत माहितीस्तव :– सर्व परिरक्षक, नांदेड/धाराशिव/लातूर.

D/PPD/new genral/192